International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Impact Factor – 4.082
Vol.4 No.2 Nov– Dec 2016

# स्त्रीवाद : एक चिंतन

**श्रीमती छाया भारत सकटे**
सहाय्यक प्राध्यापक
राज्यशास्त्र विभाग, आर्टस् अॅण्ड कॉमर्स कॉलेज, पुसेगाव

**प्रस्तावना :**

प्राचीन कालखंडाचा स्त्रियांच्या दृष्टिकोनातून विचार केला असता तत्कालीन स्त्रीजीवन हे धर्मव्यवस्था, जातीव्यवस्था, वर्णव्यवस्था, संस्कृती यांच्या वर्चस्वाखाली असल्याचे जाणवते. उच्चवर्णियांपासून ते कनिष्ठ स्तरातील सर्वच स्त्रियांच्या वाटयाला आश्रितांचे, वंचिताचे मूल्यविरहित जीवन आलेले होते. त्या अगोदर म्हणजे प्रागैतिहासिक काळात श्रमविभागणीमुळे स्त्री व पुरूष असे गट निर्माण झाले तेथून स्त्रियांना दुय्यमत्व आले. इजिप्त संस्कृती, मेसापोटेमियाच्या बॅबिलोनचे राज्य, नवीन बॅबिलोनियन या संस्कृतीत राज्यात स्त्रीला आदराचे, मानाचे स्थान होते. ती स्वतंत्र होती. निसर्गाने स्त्रीला दिलेल्या मातृत्वाच्या जबाबदारीबरोबरच तिच्याकडे कुटुंबाचीही फार मोठी जबाबदारी असते. असे असले तरी पुरुषप्रधान व्यवस्थेतच संपूर्ण कुटुंबावर पुरुषी वर्चस्व प्रस्थापित झाल्याचे दिसते. (बेडेकर, २००८ : २५) याव्यवस्थे विरुध्द स्त्री वादी चळवळ , विचार उदयास आले. या स्त्रीवादी विचाराचे चिंतन प्रस्तुत लेखात केले आहे.

**पारिभाषिक शब्द :** स्त्रीवाद, इजिप्त संस्कृती, मेसापोटेमियाच्या बॅबिलोनचे राज्य,

**उद्दिष्टे :** १. स्त्री विषयक विषयाचा अर्थ समजून घेणे
२.स्त्रीवादाचे स्वरूप अभ्यासणे

**विषयप्रवेश :**

प्राचीन समाजातील स्त्रियाचा दर्जा दुय्यम, कनिष्ठ प्रतीचा होता. स्त्री व पुरुष यांची शारीरिक व मानसिक भिन्नता हा जरी जीवशास्त्रीय स्वरूपाची असली तरी सामाजिक स्तरावर तिला या लिंगभेदावर आधारित वागणूक मिळू लागली. स्त्री-पुरुष असमानता हा मूळ मुद्दा धरून तिला सर्वच क्षेत्रात कमीपणा प्राप्त झाला. दुय्यम स्थान प्राप्त झाले. परंतु हे दुय्यम स्थान हा अन्याय विषमतेवर आधारित असल्याने याविरुद्ध स्त्रीत्वाच दुय्यम स्थान नाकारून माणूस म्हणून व्यक्ती म्हणून समाजात स्थान मिळविण्यासाठी तिचा प्रयत्न सुरू झाला. या व्यवस्थेमध्ये तिला स्वतःचे स्थान निर्माण करण्याची गरज भासू लागली व यातूनच स्त्रीवादाचा जन्म झालेला आहे.

**'स्त्री' किंवा 'बाई'चा अर्थ :**

'स्त्री' ला मराठी पर्यायी शब्द आहेत. महिला, वनिता, बाई इत्यादी अर्थ सगळीकडे समान आहे. कारण धर्मसंप्रदायांमध्ये अंतिम शोषण साधन म्हणून स्त्रीचाच वापर होतो. स्त्री/बाई शब्दाचा उच्चार संस्कृत व भाषांनुसार वेगळा असला तरी अर्थ एकच आहे. 'स्त्री' संस्कृती प्रधान शब्द असून इंग्रजीत त्याला Female

किंवा Women असे म्हणतात. स्त्री म्हणजे काय किंवा ही स्त्री कोण? या मुलभूत प्रश्नांमागे मूळ प्रश्न येतो. माणूस म्हणजे काय.? याशी ती निगडीत आहे. माणूस या संकल्पनेत स्त्री आणि पुरुष असे दोन भाग पडतात. प्रत्यक्षातील स्त्री आणि पुरुष हे दोघेही फरक करता येण्याजोगी आणि अलग करता येण्याजोगी वेगवेगळी अस्तित्वे आहेत. त्या दोघांमधून समान असलेले गुणधर्म 'त्व' रूपात एकत्र केले जातात आणि मानव ही संकल्पना तयार केली जाते. म्हणून माणूस ही संकल्पना स्पष्ट करताना फक्त पुरुष किंवा फक्त स्त्री असे सांगता येत नाही. दोघेही माणसेच असल्याने माणूस ही संकल्पना उभयान्वयी बनते.

स्त्री किंवा बाई या शब्दाचा उगम पाहिला तर कारुण्याने मन भरून जाते. या व्याख्येतच तिची बंधने स्पष्ट होतात. संस्कृत भाषेनुसार "स्त्री म्हणजे जिच्यात शुक्र आणि रक्त यांचा संचार असतो ती व्यक्ती होय." (संस्कृत-हिन्दी शब्दकोश : ११३८) या व्याख्येखेरीज अन्य व्याख्या इतक्या स्पष्टपणे दिलेल्या नाहीत. आयुर्वेदीय शब्दकोशात 'स्वाविणी' चा अर्थ योनि अथवा योनिरोग, (आयुर्वेदीय शब्दकोश, खंड दुसरा :१९६८) 'मराठी शब्दसागर'मध्ये 'स्त्री' म्हणजे भार्या, बायको, मादी (जोशी, १९६८ : ८७०) आणि ज्ञानशब्दकोशात 'स्त्रिया' म्हणजे मंगल, कल्याण आणि स्विजन म्हणजे सर्जन, सृष्टी रचना असे अर्थ दिले आहेत.

मोनिअर विल्यम्सच्या संस्कृत शब्दकोशानुसार (Sanskrit-English dictionary : १२६०) 'स्त्री' चा उगम बहुधा सूत्री अथवा सोत्री या मूळ धातुसाधित रूपापासून झाला असावा. त्याचा मूळ अर्थ 'मूल धारण करणारी'. स्त्रीम्, स्त्रीस ही त्याची अन्य रूपे. स्त्रियश्चरितम् म्हणजे स्त्रीचे चरित्र, स्वीकारक म्हणजे पती, स्त्रीषु म्हणजे स्त्रीपणानुसार इ. हाच अर्थ इतर ही संस्कृत शब्दकोशांमध्ये दिला आहे. श्री.कृ.पा.कुलकर्णी यांच्या व्युत्पत्तिकोशनुसार स्त्री म्हणजे बायको, बाई, स्वतः ची पत्नी. तसेच वैदिक संस्कृतनुसार स्त्री = सूत्री (म्हणजे जन्मदात्री, ऋग्वेद), संस्कृत 'स्त्री' संज्ञेचे वर्गमूळ स्त्रयै असे असून तिचा अर्थ विस्तरे असा आहे. (कुलकर्णी,२००४ : ८०४) पण अन्यत्र 'सौरी' या शब्दाचा अर्थ म्हणून हिजडा, Woman, Wanton असा दिला आहे. विल्यम्सच्या संस्कृत शब्दकोशात 'अडबायको' असा एक शब्द आढळतो, त्याचा अर्थ पौगंडवयीन कुमारिका असा होय.

'बाई' हा शब्द पुल्लिंगी 'बुवा' शब्दाचा प्रतियोगी म्हणून वापरला जातो. मराठीत बाई म्हणजे स्त्री किंवा महिला. संदर्भानुसार 'बाई' चा अर्थ बदलतो. साधारणतः हा मराठी शब्द नावाच्या मागे आदरार्थी अर्थाने वापरण्याची पध्दती आहे. जसे की जिजाबाई, सईबाई, राणी लक्ष्मीबाई इत्यादी नाव ठेवणे या प्रकारात काहीवेळेस 'बाया' हेच नाव बनले. इंग्रजीत 'बाई' किंवा 'स्त्री' आणि woman ही परस्परांची भाषांतरे आहेत. Woman चे अर्थ विविध प्रकारचे आहेत. जुन्या इंग्लीशमधील Wifman या शब्दापासून Woman हा शब्द बनला. 'Wif' चा मूळ अर्थ स्त्री असाच होता. त्यापासून Wife हा शब्द बनवून स्त्रीचे वैवाहिक (adult female human) स्थान निश्चित केले गेले. Wife म्हणजे Wife-person. Wife म्हणजे Woman. पण Midwife म्हणजे मधली बायका नव्हे तर मदतनीस व्यक्ति ग्रीक भाषेत Woman ला पर्यायी शब्द होता Byne त्यापासून Gynecology हा शब्द बनतो. Byne म्हणजे स्त्री, खरे तर बायकोच. बायकोचे मुख्य काम मूल निर्माण करणे. त्याकाळी नेहमीच युध्दे होत असत. मनुष्यबळाची गरज असे. साहजिकच

स्त्रीला असे मनुष्यबळ निर्माती म्हणून खूप महत्त्व होते. अशा पद्धतीने स्त्री या शब्दाचा विविध पद्धतीने बनत असला तरी त्याचा अर्थ एकच असल्याचे स्पष्ट होत. (http://old.theshtick.org/language/ woman)

**स्त्रीवादाचे स्वरूप :**

प्रस्थापित विचारप्रणालीत स्त्रीला एकतर देवता समजतात नाहीतर चेटकीण समजतात. लाजरी, मर्यादशील, विनयशील वगैरे स्त्रीत्वाच्या तथाकथित संकल्पना लादून व्यवस्थेने तिच्या व्यक्तिमत्त्वाला साचेबंद केले. भित्री, अविचारी, निर्बुद्ध वगैरे संबोधून तिचे मानसिक खच्चीकरण केले. आणि तिचे 'मानवत्व' नाकारून तिला 'वस्तुरूप' दिले. 'लिंग' आणि 'लिंगभाव' याची गल्लत करीत लिंगभावाधिष्ठित विचारव्यूह निर्माण करून स्त्री शोषणाची चिरेबंद व्यवस्था अस्तित्वात आणली. ही व्यवस्था निर्माण करण्यासाठी विविध स्तरावर आणि विविध प्रकारे केल्या जाणाऱ्या लिंगभेदाधिष्ठित राजकारणाविरुद्ध संघर्षशील बनलेली कृतिशील विचारधारा म्हणजे स्त्रीवाद होय.

१९६० च्या दशकात स्पष्ट रुप धारण केलेल्या जीवनाच्या सर्व क्षेत्रांची चिकित्सक मिमांसा करणारी स्त्रीवादी प्रणाली सतराव्या शतकात दिसते. लंडन, फ्रान्स, अमेरिका या देशांमध्ये स्त्रियांच्या हक्कासाठी ज्या चळवळी उभ्या राहिल्या त्यातून पुढे हळूहळू स्त्रीवादाची संकल्पना पुढे येऊ लागली. अशा प्रकारे पाश्चात्यांपासूनच या संकल्पनेला प्रारंभ झाला. कॅनडियन, अमेरिकन स्त्रीवादाच्या अभ्यासिका लिंडा केली यांनी न्यू वुमन या अर्थाने १८९० मध्ये 'स्त्रीवाद' या शब्दाचा वापर झाल्याचे नोंदवले तर एलीन ड्यूबोयस यांनी 'स्त्रीवाद आणि मताधिकार' या विषयीच्या संशोधन लेखात स्त्रीवाद या शब्दाचा वापर राजकीय चळवळ या हेतूने १९१० मध्ये केल्याचे सांगून या शब्दाचे मूळ फ्रान्समध्ये असल्याचे स्पष्ट केले. (कोकाटे, २००५ : ३४)

१९०१ मध्ये प्रथम स्त्रियांच्या हक्कांबद्दलची मागणी करण्यात आली आणि १९४५ मध्ये फ्रेंच स्त्रियांना मतदानाचा हक्क प्राप्त झाला. जॉन स्टुअर्ट मिल यांनीही सन १८६९ मध्ये 'दि सब्जेक्शन ऑफ वुमन' हे पुस्तक प्रसिद्ध करुन विवाहसंस्था आणि कुटुंबसंस्था स्त्रीच्या व्यक्तिविकासाला आणि स्वातंत्र्याला बाधक कशा होतात ते स्पष्ट केले. १९ व्या शतकात अमेरिकेमध्ये गुलामगिरीविरुद्ध पुकारलेल्या लढयात स्त्रिया मोठया प्रमाणावर सहभाग घेतला. यांनी 'अमेरिका सेनेका फॉल्स कन्हेंशन' ही परिषद भरवून त्यात स्त्रियांच्या स्वातंत्र्याचा व हक्कांचा जाहीरनामा घोषित केला. सिमॉन दि बोव्हा यांनी दीर्घकाळ चालत आलेल्या पुरुषसत्ताक विचारांवर आघात केला. त्यांच्या मते लिंगभेदावर आधारित पुरुषनिर्मित समाजव्यवस्थेत स्त्री लैंगिक राजकारणाची बळी ठरली. तिची फसवी प्रतिमा निर्माण केली. पुरुषप्रधान संस्कृतीत पुरुषाने स्त्रीकडे नेहमीच स्वत:च्या दृष्टिकोनातून पाहिले. पुरुष म्हणजे पूर्ण,आवश्यक तर स्त्री म्हणजे इतर, वस्तू, अनावश्यक. तिला स्वत:चे व्यक्तिमत्त्व नाही. पुरुषप्रधान समाजव्यवस्थेत पुरुष हा सत्वाचा केंद्रबिंदू तर स्त्रीचे स्थान मात्र परिघावर असते. केवळ वस्तूमात्र ठरविलेल्या स्त्रीचे 'बाई' पण पुरुषांनीच ठरविलेल्या मूल्यांनी घोषित केले जाते. स्त्रीला व्यक्ती म्हणून अस्तित्व नाकारणाऱ्या समाजव्यवस्थेने तिच्यावर लादलेली बंधने झुगारून देऊन एकुण समाजव्यवस्थेत 'सक्षम माणूस' म्हणून वावरण्याचा आपला हक्क तिने मिळविला पाहिजे या मताच्या होत्या. त्यांचा १९४९ मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'द सेकंड सेक्स' या समाजव्यवस्था तिला स्त्री म्हणून घडवते अशी भूमिका मांडली. तर १९७७ मध्ये प्रसिद्ध झालेले 'सेक्शुअल पॉलिटिक्स' या पुस्तकांद्वारे केट मिलेट यांनी पितृसत्ताक समाजव्यवस्थेवर हल्ला चढविला. अशा या लेखिकांनी आपापल्या ग्रंथातून स्त्रीवादी विचारधारेची पायाभूत मांडणी केली. त्यामुळे

'स्त्रीवाद आणि स्त्रीवादी समीक्षा यांच्या उभारणीचे आणि विकासाचे श्रेय हे सर्वस्वी पाश्चात्य स्त्रियांचे आहे' अशी भूमिका अरुणा दुभाषी मांडताना दिसतात. (दुभाषी,२०००:१४१) या स्त्रीवादाविषयी अनेक तज्ज्ञ समीक्षकांनी व्याख्या केल्या आहेत. स्त्रीवादाच्या काही अलीकडील व्याख्या पुढील प्रमाणे आहेत.

१.**रजिया पटेल** यांच्या मते "स्त्रियांना स्वतंत्रपणे आपल्या हक्कांसाठी, आत्मसन्मानासाठी लढा देणे आवश्यक आहे. हा लढा म्हणजे स्त्रीवाद होय."

२. **सुमित्रा भावे** यांच्या मते "स्त्रीवाद हा 'वाद' शब्दामुळे बंदिस्त होतो त्यामुळे स्त्रियांच्या समानतेसाठी केलेली चळवळ हा स्त्रीवाद होय"

३.**डॉ.गेल.आम्वेट** यांच्या मते "लिंगभेदावर आधारलेली श्रमविभागणी पूर्णपणे नष्ट करणे म्हणजे स्त्रीवाद होय"

४. **शुलामिथ फायरस्टोन** यांनी 'The dialectic of sex' या पुस्तकात समाजात लैंगिकतेच्या आधारे होणारे मूलभूत वर्गीय विभाजन व दडपणूक यांची मांडणी केली. त्यांच्या मते "आपण जे मानस धारण करतो ते एक निखळ भौतिक वास्तवच असते, शारीरिकतेवर आधारित असलेली आजची कुटुंबव्यवस्थाच लैंगिक विषमता व वर्णव्यवस्था निर्माण करते. त्यामुळे तिच्यामते, लैंगिक विग्रह व स्त्रीत्व-पुरुषत्व ह्या साऱ्यांचे उच्चाटन हाच स्त्रीवादी चळवळीचा हेतू असावा.(भागवत, २००० : ५९)

५.**सिमॉन दि बोव्हाआर** यांच्या मते 'स्त्रीवाद म्हणजे केवळ स्त्री हक्कांचे समर्थन नव्हे तर स्त्रीची 'स्त्री' अशी ओळख करून देणे , स्त्री प्रश्नांप्रती आस्था निर्माण करणे. (Singh, Sushila, 1997 : 21)

६.**ज्युलिएट मिचेल** यांनी फ्रॉइड व मार्क्स यांच्या सिद्धांतनाची सांगड घालून समाजवादी स्त्रीवादाची वेगळी भूमिका मांडली आहे. त्यांच्या मते "जन्मलेले मूल 'स्त्री' म्हणून घडते तेव्हा लैंगिकतेच्या क्रियाशील अंगाला दडपून एक उदासीन भूमिका स्वीकारते असे सांगून पुरुषत्व व स्त्रीत्व समाजनिर्मित आहे असे विवेचन स्त्रीवादात केले आहे.

एकूणच स्त्रियांचे हक्क आणि अधिकार यांचे समर्थन करणारे हे विचारसूत्र आहे आणि ते प्रचंड व्यापक आहे. अशा या स्त्रीवादाचा उगम प्रथमतः पाश्चात्य जगात झालेला दिसतो.

स्त्रीवाद म्हणजे स्त्रीच्या दृष्टिकोनातून जीवनाच्या सर्व पैलूंवर टाकलेला दृष्टिक्षेप. स्त्रीवाद ही एक जाणीव आहे. ते एक जीवनविषयक तत्त्वज्ञान आहे. तो एक सैद्धांतिक दृष्टिकोन आहे. त्यामुळे स्त्री पुरुषांनी स्वतंत्र व्यक्ती म्हणून सन्मानाने जगण्यासाठी सर्व सामाजिक संस्थांचा केलेला पुनर्विचार आणि पुनर्रचना म्हणजे स्त्रीवाद वैयक्तिक आयुष्यात स्त्रीवाद आपल्या पातळीवर जगण्यात उतरवता येतो. आपण कोणत्याही क्षेत्रात काम करीत असू, तरी तिथेही तो स्वत:चे अस्तित्व देणारे तत्त्वज्ञान म्हणून त्याचे अस्तित्व दिसते. म्हणजेच स्त्रीवाद हे एक पोथीबद्ध, कर्मठ, एकसाची तत्त्वज्ञान नाही आणि नसावे असे म्हणता येईल. स्त्रीवाद या तात्त्विक प्रवाहाच्या अंतर्गत अनेक उपप्रवाह असले, तरी या भेदांपलीकडे जाणारी काही समान सूत्रे स्त्रीवादी म्हणवणाऱ्या सर्वांसाठी अर्थपूर्ण ठरतात. यात त्या कालखंडात विशिष्ट सामाजिक परिवेशात स्त्रीत्व आणि पुरुषत्वाची व्याख्या कशी ठरते, त्याची कोणती वैशिष्टये तो समाज ठरवतो हे तपासणे, स्त्री-पुरुषांच्या वर्तनप्रकारातील भिन्नतेमागची समाजनिर्मित कारणे कोणती हे खोलात जाऊन तपासणे,

पुरुषप्रधान व्यवस्थेची आर्थिक, ऐतिहासिक व राजकीय कारणमीमांसा करून स्त्रियांचे दुय्यमत्व कमी व्हावे, स्त्रीदास्याचा अंत व्हावा, म्हणून सातत्याने प्रयत्न करणे हे काही समान दुवे आहेत. ( लांडे , २००९ :३)

स्त्रीवादी शब्दाचा अर्थ काटेकोर पद्धतीने लावला तर, स्त्रीवादी चळवळीने समाजाच्या मूलभूत आणि सम्यक् परिवर्तनाचाच विडा उचलला पाहिजे. सामाजिक, राजकीय, आर्थिक या सर्व पातळयांवर असणाऱ्या पुरुषप्रधानतेला शह देऊन संरचनात्मक बदलासाठी पावले उचलणे, या सामाजिक संरचनांची स्त्रीवादी मूल्यांनुसार नवी बांधणी करणे, तसेच खऱ्या अर्थाने लोकशाही विकेंद्रीकरण ही तत्वे राबविण्याचा आणि तसे संस्कार करण्याचा अविरत प्रयत्न करणे अशा अनेक गोष्टी स्त्रीवादात अनुस्यूत आहेत. (भागवत, १९८९ : २)

अशा प्रकारे पुरुषांपासून फारकत घेऊन स्त्रीने आपला स्वतंत्र सुभा निर्माण करणे म्हणजे स्त्रीवाद नव्हे. तर स्वतःच्या सामर्थ्याचा शोध घेऊन आपल्या विकासासाठी पुरुषांच्या बरोबरीने खांद्याला खांदा लावून जीवन जगण्याचे स्त्रीवाद समर्थन करतो. पितृसत्ताक समाज व्यवस्थेने प्रस्थापित केलेली परंपरा मोडून स्त्रियांचा विकासाचा मार्ग चोखाळणे म्हणजे स्त्रीवाद होय. स्त्रीवाद स्त्री आणि पुरुष यांच्यातील सामाजिक भेद नाकारतो. स्त्रीवाद्याच्या मते, स्त्री आणि पुरुष यांच्यात केवळ लिंग भेद आहे असे मानतो. लिंगभाव मानत नाही. पुरुषप्रधान समाजव्यवस्थेत स्त्रीला देवता दासी मानले गेले आहे. सामाजिक संकेत आणि मूल्यांच्या नावाखाली तिला 'माणूस' म्हणून स्थान नाकारण्यात आले आहे. तिच्यातील मानवत्त्व नाकारून तिला वस्तुरूप दिले आहे. स्त्रीला गुलाम म्हणूनच वागविणे कसे योग्य आहे याचे उदात्तीकरण करण्यात आले आहे. स्त्री शोषणास अनुकूल अशी व्यवस्था समाजात निर्माण करण्यात आली आहे. अशा प्रकारच्या लिंग भेदाच्या विरुध्दची कृतिशील चळवळ म्हणजे स्त्रीवाद होय. या विचारसरणीचा मानस स्त्री पुरुष विषमतेवर आधारित असणार हे जग बदलण्याचा आहे.

स्त्रीवाद ही एक समाजपरिवर्तन घडवू पाहणारी राजकीय जाणीव आहे. प्रत्येक ऐतिहासिक टप्प्यावर मानवी समाजामध्ये स्त्री-पुरुषांमध्ये विशिष्ट प्रकारचा सत्तासंबंध जोडला जातो. हे स्त्रीवादी जाणिवेमध्ये दिसून येते. लिंगभेदाधिष्ठित विषमता जीवशास्त्रीय म्हणजे निसर्गानुसार नसते तर मानवी संस्कृतीत घडविली जाते असे स्त्रीवादी मानतात. जात, वर्ग, वंश धर्म इत्यादी संरचनेप्रमाणेच पुरुषप्रधानता नावाची संरचना असते असा दावा स्त्रीवादी विचारप्रणाली करते. पुरुषप्रधानता आणि लिंगभाव या दोहोंची घडण स्त्रियांच्या (लैंगिक, सामाजिक, आर्थिक ) श्रमांच्या अपहरणातून सिध्द होते. यामधूनच पुरुष वर्चस्वाच्या मूल्य व्यवस्थेचा डोलारा उभारला जातो. लिंगभावाची जडणघडण अनेक संरचनांच्यामधून आकार घेत असते म्हणून स्त्रीवादी जाणीव ज्ञानाच्या प्रत्येक शाखेशी संलग्न विचार आणि कृती करण्याचा प्रयत्न करते.(भागवत, २००४ :१०८) आपल्या 'स्व' ची अथवा 'अहं' ची जडणघडण कशी झाली आहे याचा शोध घेण्यापासून ते आंतरराष्ट्रीय राजकारणापर्यंत स्त्रीवाद स्पर्श करतो. स्त्रीवादाची जाणीव ही एकच एक साचा अथवा एकाकार नसतो. इतिहासाच्या भिन्न टप्प्यावर विविध परिप्रेक्ष्यांतून स्त्रीवाद कार्य घडत असते. उदारमतवादी, मार्क्सवादी, समाजवादी, आधुनिककोत्तर अशा अनेक विचारप्रणाली मध्ये स्त्रीवाद स्वतःच्या विचारांची भर टाकत असते. स्त्रीवाद हा स्त्री-पुरुष प्रश्नांची मीमांसा करते म्हणून काळाच्या प्रत्येक टप्प्यावर स्त्रीवादाची भिन्न रूपे दिसतात.

"स्त्रीवाद हा कोणत्याही एका नावाशी जोडलेला वाद नाही. स्त्रीवादी राजकीय जाणीव परिवर्तनाच्या आकांक्षेतून निर्माण झालेली जाणीव आहे आणि ती मानवी अस्तित्वाच्या बौध्दिक शारीरिक, सामाजिक आणि सृजनात्मक जाणिवांचा एकत्रित आणि समाजाला पोषक असा आविष्कार घडवू बघते आहे". (भागवत, २०१२ : ५) स्त्रीवादी विचारसरणीचा आणि चळवळीचा उदय हा पाश्चात्य विचारसरणीच्या आधारावर झाला आहे. स्त्रीमुक्ती आणि स्त्रियांच्या अधिकारांचा पुरस्कार करणारी स्त्रीवाद ही एक सर्वसमावेशक विचारसरणी आहे. स्त्रियांच्या सामाजिक भूमिकेचा आग्रह धरणारी स्त्रीवादी विचारसरणी भारतात स्वातंत्र्यपूर्व काळापासून असलेली दिसते. स्त्रीवादी विचारसरणीचे दोन प्रमुख आधारभूत तत्वे आहेत.

१.लिंगभेदाच्या आधारावर स्त्रियांना पुरुषांच्या तुलनेने विषम वागणूक दिली जाते.

२.ही विषम वागणूक नष्ट व्हावी, या आधारावर स्त्रीवादी विचारसरणीमध्ये लिंगभेदाला विरोध, पुरुषांप्रमाणेच स्त्रियांना सर्वच क्षेत्रामध्ये समान अधिकार, शोषण आणि विषमतेवर आधारित पुरुषप्रधान सामाजिक व्यवस्थेला विरोध, स्त्रियांना सर्वप्रकारचे अधिकार मिळावे या जाणिवेतून स्त्री चळवळीचा उदय झाला पुढे या चळवळीचा विस्तार होऊन तिचे विविध प्रवाह निर्माण झाले.

१.उदारमतवादी स्त्रीवाद प्रवाहामध्ये प्रामुख्याने व्यक्तिस्वातंत्र्य, समानतेला बांधिलकी या तत्वाला महत्त्व दिले. स्त्रियांचे नागरिक हक्क उदारमतवादामध्ये अपेक्षित आहेत.

२. समाजवादी स्त्रीवादामध्ये स्त्रियांच्या उपेक्षित जीवनाला आणि शोषणाला मांडवलशाही उत्पादनपध्दती जबाबदार असल्याचे हा प्रवाह मांडतो.

३. अमुलाग्र स्त्रीवादामध्ये राजकीय दृष्टिकोनातून लिंगभेदावर आधारित विषमतेचे विश्लेषण करून ही विषमता दूर करण्यासाठी कुटुंब व्यवस्थेच्या अमुलाग्र पुनर्रचनेची मागणी करणारा हा प्रवाह आहे.

या तीन प्रवाहांची लिंगभेदावर आधारित विषम सामाजिक व्यवस्था नष्ट व्हावी आणि पुरुषाप्रमाणेच महिलांना देखील सर्वच क्षेत्रांमध्ये समान अधिकार, दर्जा, संधी, प्रतिष्ठा मिळावी अशी प्रमुख मागणी आहे. या प्रवाहाच्या माध्यमातून स्त्रीवादी विचारवंत लेखिका स्त्रियांच्या प्रश्नांबाबत लेखन करून तसेच आपल्या विचारांच्या मांडणीतून स्त्रियांच्या प्रश्नांबाबत कार्य करू लागल्या. भारतात व महाराष्ट्रात या विचारसरणींच्या आधारावर स्त्री चळवळी सुरु झाल्या. (भागवत, २०१२ : २) यातून विविध स्त्री संघटना निर्माण झाल्या. एकोणिसाव्या शतकात भारतात ब्रिटिश सत्ता जसजसी स्थिरावत गेली. तसतसी ब्राम्हो समाज, प्रार्थना समाज, आर्यसमाज, रामकृष्ण मिशन, सार्वजनिक सत्यधर्म या संस्थानी स्त्रियांच्या सुधारणेसाठी प्रयत्न केले.

**संदर्भ सूची :**

1. आपटे ज.श., रोडे पुष्पा, (२००८)," भारतातील महिला विकासाची वाटचाल ", डायमंड पब्लिकेशन, पुणे.
2. कुलकर्णी कृ.पा., (२००४)," मराठी व्युत्पत्तिकोश ", शुभदा सारस्वत प्रकाशन, पुणे.
3. कोकाटे गुंपा, (२००५), " स्त्रीवादी समीक्षादृष्टीतून सानियाचे साहित्य " , नवभारत, मुंबई.
4. गव्हाणकर रोहिणी, (१९७५), " कथा अग्निशिखांच्या ", श्री विद्या प्रकाशन, पुणे.

5. गीताली मंदाकिनी, (२००७), " निकोप - स्त्री प्रश्न सोडवताना ", दिलीपराज प्रकाशन, पुणे.
6. चोरमारे विजय, (२०१४), " स्त्री सत्तेची पहाट ", एक्सप्रेस पब्लिकेशन हाऊस, कोल्हापूर.
7. दुभाषी अरुणा , (२०००), " भारतीय स्त्रीवाद , समीक्षेतील नव्या संकल्पना ", संपा. मनोहर जाधव, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद.
8. नानिवडेकर मेघा (संपादक), (२००५), " महाराष्ट्रातील स्त्री चळवळीचा मागोवा, ( १९७५ पासून) ", प्रतिमा प्रकाशन, पुणे व स्त्री अभ्यास केंद्र,पुणे.
9. भागवत कमल, (१९८५), " स्त्री चळवळीची वाटचाल ", प्रागतिक पुस्तक प्रकाशन, पुणे.
10. भागवत विद्युत, रेगे, शर्मिला, पलसाने, वंदना(संपा), (२०००), " स्त्री जीवनाची गुंतागुंत ", मुंबई विकास अध्यासन केंद्र,मुंबई.
11. भागवत विद्युत, (मे १९८९ ), " खाजगी, परामर्श, खंड ११" अंक १,पुणे.

**शब्दकोश :**

1. आपटे वामन शिवराम,(संपा) (२०१९), " संस्कृत-हिन्दी शब्दकोश ", ज्ञान प्रकाशन, पाचवी आवृत्ती, मुंबई.
2. जोशी नारायण हरी जोशी, (संपा) (१९८५), आयुर्वेदीय शब्दकोश, खंड दुसरा महाराष्ट्र राज्य साहित्य आणि सांस्कृतिक मंडळ, मुंबई.
3. जोशी नारायण हरी (संपा),(१९८९), "संस्कृत शब्दकोश", साहित्य महाराष्ट्र साहित्य आणि संस्कृती महामंडळ, मुंबई .
4. प्रा. जोशी व प्रा. देशपांडे (संपा), १९८२), " ज्ञानशब्दकोश " , योगेश्वर प्रकाशन, डोंबिवली.